655

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.
जा.क्र.झोपुप्रा./तां.३/१९९४/२०२४
दिनांक : ०६ /०८/२०२४

# झोपडपट्टी पुनर्वसन योजना (प्रशासकीय मान्यता)

(विकास नियंत्रण नियमावली झोपुप्रा, २०२२ मधील नियम क्र. १४.६.१२(१) अन्वये योजनेस अंतिम प्रशासकीय मान्यता)

प्रस्तावना :

१. मौजे चिंचवड, सि.स.न. १८६७(पै), १८६७/५, १८६७/४८ ते १८६७/६६ व ३११८, ३११८/१ ते ३११८/१५, ३११८/१७, ३११८/१८, (स.न. १७४(पै)), वेताळनगर, पुणे झोपडपट्टी संदर्भात १४५०७.४६ चौ. मी. क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. क्रिशला एलाईट एल. एल. पी. यांचे मार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.०५/०३/२०२४ रोजी सदर मिळकतीवरील ७३.६३% झोपडीधारकांच्या संमतीसह प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे.

२. सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याच्या दृष्टीने विकसकामार्फत या कार्यालयात दाखल करण्यात आलेल्या प्रस्तावास अनुसरून या प्राधिकरणामार्फ़त दि.२६/०६/२०२४ रोजी उक्त नियमावलीतील नियम क्र. १४.६.१२(१) अन्वये "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र प्रारुप योजना" मंजूर करण्यात आलेली असून सदर मिळकतीवरील झोपडीधारकांना व सर्व संबंधितांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रारूप योजने संदर्भात प्राप्त दावे/हरकत/सुचना संदर्भातील स्थिती खालीलप्रमाणे आहे.

सदर मिळकतीवरील कोणत्याही झोपडीधारकाची विहीत मुदतीत सदर प्रारुप योजनेसंदर्भात लेखी हरकत/सुचना अथवा तक्रार या प्राधिकरणास प्राप्त झालेली नाही.

३. सदर योजनेकरीता सक्षम प्राधिकारी क्र.३ यांनी अंतिम पात्रता यादी दि.१५/०३/२०२४ रोजी सादर केली आहे. सदर झोपडपट्टी संदर्भात यापूर्वी पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी दि.२१/०२/२०२४ रोजी सादर केलेले अभिप्राय विचारात घ्यावेत, तसेच BSUP- JnNURM अंतर्गत राबविण्यात आलेल्या योजनेतील लाभार्थींना दुबार लाभ होऊ नये याची दक्षता विकसक आणि सक्षम प्राधिकारी यांनी घ्यावी. सक्षम प्राधिकारी यांच्याकडील दि.१५/०३/२०२४ रोजीच्या अंतिम पात्रता यादीतील संरचना संख्येनुसार नगर रचना विभागाकडून प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच, सदर प्रकरणी BSUP- JnNURM अंतर्गत योजना राबवितेवेळी अधिनियमाचे कलम ३ (क) अंतर्गत अधिसुचित केलेले क्षेत्र झोपुप्राचे संबंधित सक्षम प्राधिकारी यांचेकडून निराधीसुचित (De-Notify) करणे आणि झोपुप्रा च्या विकसकाने सादर केलेल्या योजने संदर्भातील क्षेत्र अधिसुचित करणे आवश्यक राहील.

४. दि.२६/०६/२०२४ रोजी प्रसिध्द केलेली प्रारूप योजना या आदेशातील नमूद बाबींसह दोन्ही आदेशामधील शर्ती-अटींसह अंतिम करण्यात येत असून योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदरच्या योजनेत आवश्यकतेप्रमाणे बदल करण्यात आल्यास ते झोपडीधारकांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस तसेच झोपडीधारकांना बैठकीद्वारे वेळोवेळी विकसकामार्फत परस्पर अवगत करण्यात येतील.

५. सदर योजनेद्वारे विकसक मे. क्रिशला एलाईट एल. एल. पी. यांना सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकरीता या प्राधिकरणाच्या वतीने प्राधिकृत करण्यात येत असून विकसक यांनी उक्त अधिनियमातील व उक्त नियमावलीतील तरतूदीस अधिन राहून सदर योजनेची अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील. मनपाने सदर क्षेत्रात राबविलेल्या BSUP- JnNURM योजना व तेथील पात्र लाभार्थींचा विचार करुन योजना राबवणे अनिवार्य असेल. सदर योजना राबविण्यासाठी अपेक्षित असलेले सर्व व्यवस्थापन व होणारा सर्व खर्च करणेची संपूर्ण जबाबदारी विकसकाची आहे.

६. सदर योजनेचे विकसक मे. क्रिशला एलाईट एल. एल. पी. यांनी सदर मिळकतीवर विहित मुदतीत प्रकल्प सुरू करणे, बांधकाम व प्रकल्प पूर्ण करणे बंधनकारक राहील. योजना अंमलबजावणी संदर्भातील शासनाची अन्य संविधानिक प्राधिकरणे/विभाग तसेच झो.पु.प्राधिकरणाचे सर्व नियम/निर्देश लागू राहतील व त्यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे अनुपालन करणे विकसक यांच्यावर बंधनकारक राहील.

७. या प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४५ अन्वये विकास/बांधकाम परवानगी (Commencement Certificate) देणेसंदर्भात आदेश स्वतंत्रपणे पारित करण्यात येतील.

सदर योजना राबविण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत असून माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह आदेश जारी करण्यात येत आहेत. प्रस्तुतचा निर्णय हा सर्व संबंधितांवर बंधनकारक राहील आणि त्या संदर्भात अपील दाखल करावयाचे असल्यास ते शीर्षस्थ तक्रार निवारण समिती (Apex Grievances Redressal Committee) कडे करता येईल याची नोंद घ्यावी.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- /०८/२०२४

मुख्य कार्यकारी अधिकारी,
O/C झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.
5.8.2024
Shradha 31/07/2024
01/08/24

प्रत माहितीस्तव :

१. मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी जमिनीचे भोगवटादार.
२. विकसक - मे. क्रिशला एलाईट एल. एल. पी., ऑफिस नं.- ४१०, ४था मजला, सिटी अवेन्यु, वाकड, पुणे- ४११०५७.